सं.फौ.ख.क्र. ९३५/२०२४
सरकार –वि– संजय,
नि.क्र.०५ खाली

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०१ यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–**

माझे नाव — राजेंद्र सदाशिव साठवणे
वय. ५३ वर्षे, व्यवसाय — मजुरी,
राह. – गांधीनगर, तुमसर, ता. तुमसर, जिल्हा – भंडारा.

**सरतपासणी सरकार तर्फे श्री. पी.आर. भलावी सरकारी वकील.**

पोलिसांनी माझे समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. त्याचप्रमाणे जप्तीची कार्यवाही देखिल केली नाही. मी केवळ पोलिसांनी सांगितलेल्या कागदांवर सह्या केल्या होता. आता मला अभिलेखावरील सुचनापत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीसाठी **निशाणी ०७** देण्यात येते. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीसाठी **निशाणी ०८** देण्यात येते. आता मला अभिलेखावरील जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीसाठी **निशाणी ०९** देण्यात येते. आता मला अभिलेखावरील रिकाम्या बाटलचा पंचनमा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीसाठी **निशाणी १०** देण्यात येते.

**साक्षदार अभियोग पक्षाचे प्रकरणास दुजोरा देत नसल्यामुळे सहायक सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी न्यायाच्या हितार्थ देण्यात येते.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०५.२०२४ रोजी पोलिसांनी मला सुचनापत्र देवुन घटनास्थळी बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझेसमक्ष आरोपीच्या राहत्या घरी रविदास नगर, तुमसर येथे घटनास्थळ पंचनाम्याची कार्यवाही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर पोलिसांनी आरोपीकडुन दोन प्लास्टीक डबकीमध्ये प्रत्येकी ५ लिटर प्रमाणे एकुण १० लिटर मोहाफुलाची दारू व ३ प्लास्टीक बॉटलमध्ये प्रत्येकी १ लिटर प्रमाणे ३ लिटर मोहाफुलाची दारू अशी एकुण १३ लिटर मोहाफुलाची दारू

जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यापैकी नमुना दारू काढण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. वासनिक यांनी नाकारला.</u>**

**फेरतपास काही नाही.**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/– | स्वा/– |
| (आर. पी. बाठे) | (आर. पी. बाठे) |
| न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर | न्या.दं.प्र.वर्ग, तुमसर |
| दि. १३.०८.२०२५ | दि. १३.०८.२०२५ |